प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

CIDCO WE MAKE CITIES
सिडको शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294; email: ratambepriya@gmail.com

**दि. १६.०६.२०१९**

# खारघर नोड् येथे सिडकोच्या सार्वजनिक सायकल योजनेचा प्रारंभ

सिडकोतर्फे सुरू करण्यात आलेली सार्वजनिक सायकल योजना पर्यावरणपूरक तर आहेच; परंतु सायकलच्या वापरास चालना मिळाल्याने व्यायामासाठी सहज-सोपे साधन उपलब्ध होऊन नागरिकांना निरोगी आयुष्याचा लाभ होईल, असे उद्गार **श्री. प्रशांत ठाकूर**, अध्यक्ष, सिडको यांनी काढले. श्री. ठाकूर व सिडकोचे उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक **श्री. लोकेश चंद्र** यांच्या शुभहस्ते व अन्य मान्यवरांच्या उपस्थितीत सिडकोच्या सार्वजनिक सायकल योजनेस प्रारंभ झाला.

या प्रसंगी सिडकोचे सहव्यवस्थापकीय संचालक-१, **श्री. अशोक शिनगारे**, मुख्य अभियंता (नवी मुंबई); **श्री. केशव वरखेडकर**, अतिरिक्त मुख्य अभियंता, (नवी मुंबई व मेट्रो); **डॉ. के. एम. गोडबोले**, जनसंपर्क अधिकारी; **श्रीमती प्रिया रातांबे**, वरिष्ठ परिवहन अभियंता; **श्रीमती गीता पिल्लई**, अधिक्षक अभियंता, खारघर; **श्री. रमेश गिरी**, कार्यकारी अभियंता, खारघर; **श्री. संजय पुढाळे**, ऑपरेशन हेड, युलु बाईक्स, **श्री. दीपक शर्मा**, आणि स्वच्छ खारघर मंच **श्रीमती मंगल कांबळे**, हे उपस्थित होते.

या वेळी बोलताना श्री. प्रशांत ठाकूर यांनी सिडकोतर्फे लवकरच खारघर ते नवीन पनवेल नोड् दरम्यान या योजने अंतर्गत अधिकाधिक सायकली उपलब्ध करून दिल्या जातील, असे सांगितले.

श्री. लोकेश चंद्र यांनी ही योजना म्हणजे सिडकोने वाहतूक कोंडी आणि प्रदूषणमुक्तीच्या दिशेने टाकलेले एक क्रांतिकारी पाऊल म्हणावे लागेल, असे उद्गार काढले.

सदर सार्वजनिक सायकल योजना ही पब्लिक बायसिकल शेअरिंग सिस्टिम तत्त्वावर आधारित आहे. युलु बाईक्सच्या सहकार्याने ही योजना राबविण्यात येणार आहे. यापूर्वी नवी मुंबई महानगरपालिका क्षेत्रात युलु बाईसिकल्सतर्फे ही योजना यशस्वीरित्या राबविण्यात आली होती. तसेच पुणे आणि बंगळुरूमध्येही ही योजने राबविण्यात आली होती.

सदर योजने अंतर्गत शहरात जवळच्या अंतरांवर सायकल स्थानके उभारण्यात येणार आहेत. यामुळे एका स्थानकातून घेतलेली सायकल शहरातील अन्य सायकल स्थानकावर परत करता येणार आहे. आधुनिक व उत्तम स्थितीतील सायकली आणि सायकल स्वारीसाठी आकारण्यात येणारे अल्प भाडे, हे या

योजनेचे वैशिष्ट्य आहे. या योजनेमुळे खारघरमधील नागरिकांना विरंगुळ्या बरोबरच कामाच्या ठिकाणी किंवा इच्छित बस किंवा रेल्वे स्थानकापर्यंत जाण्यासाठी सायकलीचा वापर करता येणार आहे.

सदर योजना ही व्यक्तिकेंद्री वाहतुकीला चालना देणारी असून खारघर हा अशा प्रकारची सुविधा असणारा पहिला सिडको नोड् ठरणार आहे. सायकलच्या वापरामुळे व्यायामाचा हेतू साध्य होण्याबरोबरच कार्बन व अन्य विषारी वायुंचे होणारे उत्सर्जनही टळते.

सिडकोने युलु बाईक्सला खारघर नोड्मध्ये एक वर्षाच्या कालावधीकरिता सार्वजनिक सायकल योजना सुरू करण्यास तत्त्वत: मान्यता दिली आहे. शंभर ठिकाणी सुरू करण्यात येणाऱ्या सायकल स्थानकांमुळे रेल्वे स्थानकासारख्या गजबजलेल्या ठिकाणांसह खारघरमधील बहुतांशी ठिकाणी नागरिकांना या योजनेचा लाभ घेता येणार आहे. सिडकोच्या या पर्यावरणपूरक योजनेते सर्व स्तरांतून स्वागत होईल यात शंका नाही.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**